# कौशल्या मरकंटे सेट उत्तीर्ण

**देगलूर / प्रतिनिधी**



अडत व्यापारी शिक्षण संस्था संचालित देगलूर महाविदयालयातील लोकप्रशासन विभागात पदवी व पदव्यूतर शिक्षण पूर्ण केलेल्या व विद्यापीठाच्या गुणवता यादीत स्थान प्राप्त करुन महाविदयालयाच्या गुणवतेचा वारसा जपलेली विद्यार्थिनी कु. कौशल्या रामचंद्र मरकंटे हिने सेटमध्ये यश प्राप्त केले आहे. सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे आयोजित राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) दि.२६ सप्टेंबर २०२१ मध्ये घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून कौशल्या रामचंद्र मरकंटेने सेट परीक्षा उत्तीर्ण केली आहे. त्याबद्दल अड्त व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री प्रकाश पाटील बेंबरेकर, सचिव शशिकांत चिद्रावार , उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे, सहसचिव सूर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य राजकुमार महाजन, डॉ कर्मवीर उनग्रतवार , देवेंद्र मोतेवार , गंगाधर जोशी, जनार्दन चिद्रावार, रवींद्र द्याडे, चंद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य निवृती गोविंदवार , पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील , कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी, लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्रप्रमुख डॉ बी.आर. कत्तूरवार , डॉ. एस.,एम. देबडे व प्रा. ज्ञानेश्वर कोकणे यांनी अभिनंदन केले आहे.